दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २६२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२२ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## जुनी पेन्शन योजना बंद : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । नागपूर**

राज्यातील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू होणार नसल्याचे सरकारने बुधवारी विधिमंडळात जाहीर केले. महाराष्ट्रातही जुनी पेन्शन योजना लागू व्हावी,अशी मागणी पुढे आली. मात्र बुधवारी (२१ डिसेंबर) अधिवेशनादरम्यान विधिमंडळात बोलताना फडणवीस यांनी याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली असून ही योजना लागू करता येणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करणार नाही. या योजनेसाठी राज्यावर १ लाख १० हजार कोटी रुपयांचा बोजा आहे. राज्य दिवाळखोरीत निघेल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर बोलताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

शाळांबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ३५० शाळा होत्या, त्यांची संख्या ३ हजार ९०० झाली आहे. हा व्यवसाय नाही, विद्यार्थ्यांना शिकवायचे आहे. ११०० कोटी रुपयांचा बोजा आहे, मात्र पुढच्या तीन वर्षांत हा बोजा ५ हजार कोटी रुपयांचा असेल.

# ‘त्या’ महिलेचा खुन करणारे आरोपी गजाआड

## गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाची कारवाई ; पनवेल येथील धामणी गावाजवळ आढळला होता मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**माथेरानच्या पायाशी असलेल्या धामणी गावाजवळ गाढी नदीच्या पुलाखालील नदी पात्रात एका २५ ते ३० वर्षे वय असलेल्या एका अनोळखी महिलेचा मृतदेह मिळून आले होते. सदर ठिकाणी पोलीसांनी जावून खात्री केली असता सदर महिलेचा गळा आवळून खून करून महिलेचे प्रेत नदीपात्रात फेकुन दिले असल्याने लक्षात आहे. सदर घटनेवरून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. एखाद्या महिलेची अशाप्रकारे निर्घृण हत्या करून प्रेत फेकुन देणे या गंभीर गुन्हयाची तात्काळ उकल करणेबाबत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय मोहिते, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमित काळे यांनी आदेशित केले होते. गुन्हयाचे घटनास्थळ हे निर्जन ठिकाणी असल्याने सदर ठिकाणी कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सीसीटिव्हि फुटेज मिळुन येत नसल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणने हे पोलीसांना अतिशय आव्हानात्मक होते.**








सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल, नवी मुंबई पथकाने मयत महिलेच्या प्रेतावरील वस्तूंचे बारकाईने निरीक्षण केले. तसेच गुन्हयाच्या घटनास्थळावरील परिस्थितीजन्य पुरावे व इतर भौतीक दुवे यांची तत्परतेने माहिती घेत तपास तात्काळ सुरू केला. पथकाने आहेरात्र मेहनत घेवून नवी मुंबई, मुंबई, ठाणे परिसरातील हरवलेल्या महिलांचा शोध घेतला, भौतिक पुराव्याचे दृष्टीने मिळालेल्या वस्तूवरून एका विशिष्ट ब्रॅन्डच्या घातलेल्या चप्पल वरून शोध घेण्यात सुरुवात करून कसोशिने व कौशल्याने विकत घेतलेल्या दुकानाच्या आसपासचा परिसर पिंजून काढला आणि तांत्रिक तपास करून महिलेचे सोबत असलेल्या इसमाची ओळख पटवण्यात आली. यामध्ये सीसीटिव्ह फुटेजमधील संशयीत आरोपीताचा शोध घेत असताना तो घनसोली परिसरामध्ये असल्याचे गुप्त बातमिदारामार्फत माहिती मिळाली. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेलच्या पथकाने सापळा लावुन रियाज समद खान (वय ३६ वर्षे, राठी– रूम नं. ५०६, म्हाडा कॉलनी, गौतम नगर, देवनार) आणि इमाण इस्माईल शेख (वय २८ वर्षे, राठी रूम नं ६११, बिल्डींग नं २ सी, इंडीयन ऑइल नगर) यांना ताब्यात घेतले आणि त्यांची चौकशी केली. यामध्ये ज्या महिलेचा खून झाला होता ती महिला उर्वशी सत्यनारायण वैष्णव (वय २७ वर्षे, राठी – कोपरखैरणे( असून ती रियाज खान याची प्रेमिका असल्याचे सांगितले. त्याच्या मागे तिने लग्नाकरीता तगादा लावल्याने रियाज याने त्याचा मित्र इमान शेख यांच्या मदतीने उर्वशीचा लाल रंगाच्या बलेनो कार मध्ये तिचा रस्सीने गळा आ–वळुन खुन केला. तसेच दोघांनी मृतदेहाची विल्हेवाट लावणेसाठी धामणी येथे गाढी नदीचे पुलावरून मृतदेह फेकुन दिल्याचे तपासात निष्पण झाले. या गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना पुढील तपासकामी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले. अतिशय क्लिष्ट गुन्हयाची उकल करण्यात गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल, नवी मुंबई चे पथकाला यश आले आहे. सदरची उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षण रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाची सपोनि प्रविण फडतरे, संदिप गायकवाड, पोलिस उप निरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील, सुदाम पाटील, पो. हवा. प्रशांत काटकर, दिपक डोंगरे, रणजित पाटील, सचिन पाटील, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, अजित पाटील, जगदिश तांडेल, ज्ञानेश्वर वाघ, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, सागर रसाळ, पो.ना, अजिनाथ फुंदे, प्रफुल मोरे, नंदकुमार ढगे, अभय मेऱ्या, पो. शि. संजय पाटील, विक्रांत माळी यांनी केली आहे.

## रश्मी शुक्लांच्या अडचणी वाढणार; पुण्याच्या न्यायालयाने क्लोजर रिपोर्ट फेटाळला

**दै.रायगड नगरी । पुणे**

राज्यात शिंदे–फडणवीस सरकार आल्यानंतर रश्मी शुक्ला यांचा तपास बंद करण्यासाठी पोलिसांनीन्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. त्यामुळे शुक्ला यांना दिलासा मिळाला होता. मात्र, पुण्याच्या न्यायालयाने बुधवारी क्लोजर रिपोर्टच फेटाळल्याने शुक्ला अडचणीत सापडण्याची शक्यता असून, न्यायालयाचा हा निर्णय शिंदे –फडणवीस सरकारला धक्का मानला जात आहे.



राज्यातील मोठ्या नेत्यांचे फोन टॅप करण्याचे प्रकरण उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली होती. २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेने भाजपला धक्का देत काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोबत घेऊन महाविकास आघाडीची स्थापना केली होती. हे सर्व राजकीय नाट्य महिनाभर सुरु होते. या काळात रश्मी शुक्ला यांनी राज्य गुप्तचर विभागाच्या प्रमुखपदी असताना राज्यातील मोठ्या नेत्यांचे फोन टॅप केले असल्याचे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आमदार बच्चू कडू, माजी खासदार संजय काकडे, आमदार आशिष देशमुख, खासदार संजय काकडे, एकनाथ खडसे यांचा समावेश होता. ज्या नेत्यांचे फोन टॅप करायचे आहेत, त्यांची बनावट नावे सांगून, हे कुबाड रचले होते. त्यामुळे रश्मी शुक्ला अडचणीत आल्या होत्या. आरोप झाल्यानंतर रश्मी शुक्ला केंद्रीय प्रतिनियुक्तीवर सीआरपीएफमध्ये निघून गेल्या. परंतु, महाविकास आघाडी सरकारने फोन टॅपिंग प्रकरणाची पाळेमुळे खोदून काढण्यासाठी हे प्रकरण मुंबई सायबर सेलकडे सोपवले होते. या सगळ्या चौकशीला रश्मी शुक्ला यांनी अपेक्षित सहकार्य केले नव्हते. त्या चौकशीसाठी मुंबई यायला तयार नव्हत्या. मी पत्रव्यवहाराद्वारे उत्तरे देईन, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. यानंतर सायबर पोलिसांचे पथक हैदराबादलाही गेले होते. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रश्मी शुक्ला यांना अटक होणार असल्याची चर्चा होती.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उच्चस्तरीय समितीने अहवाल सादर केला होता. त्यानंतर शुक्ला यांच्या विरोधात राज्य शासनाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात शुक्ला यांच्या विरोधात बंडगार्डन पोलीस ठाण्यात टेलिग्राफ ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

परंतु, राज्यात शिंदे–फडणवीस सरकार आल्यानंतर रश्मी शुक्ला यांचा तपास पोलिसांनी बंद करण्यासाठी कोर्टात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. परंतु, न्यायालयाने तो फेटाळून लावला आहे.

## रामशेठ ठाकूर यांनी शिवकरच्या शिलेदारांचे केले अभिनंदन



**शिवकर ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांनी शेकापच्या उमेदवारांचा दारुण पराभव केला. नवनिर्वाचित सरपंच आनंद ढवळे आणि सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची बुधवारी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनेश ढवळे व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## सिटीझन पर्सेप्शन सर्व्हेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या चित्रकला व निबंध स्पर्धा आणि कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सध्या सिटीझन पर्सेप्शन सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणांतर्गत आज (२१ डिसेंबर)लोकनेते दि.बा पाटील, हुतात्मा हिरवे गुरूजी जीवन शिक्षण विद्यामंदिर, उर्दु प्राथमिक शाळा याठिकाणी विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध स्पर्धा आणि कार्यशाळा घेण्यात आले.

देशातील राहण्यायोग्य शहरांची स्पर्धा केंद्र शासनाने आयोजित केली आहे. या स्पर्धेमध्ये एक लाख लोकसंख्या व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा समावेश आहे. ‘इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स’ या स्पर्धेत नागरिकांचा सहभाग खूप महत्वाचा आहे. पनवेल महानगरपलिकाही या स्पर्धेत सहभागी झाली आहे. याच पार्श्वभूमीवर आज लोकनेते दि.बा पाटील, हुतात्मा हिरवे गुरूजी जीवन शिक्षण विद्यामंदिर, उर्दु प्राथमिक शाळा याठिकाणी विद्यार्थ्यांच्या चित्रकला, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच पर्यावरणाविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने या तीनही शाळेत कार्यशाळा घेण्यात आली.

इज ऑफ लिव्हिंग इंडेक्सचा भाग म्हणून ‘सिटीझन पर्सेप्शन सर्व्हे’अर्थात ‘नागरिक धारणा सर्वेक्षण’ केंद्र शासनाने आयोजित केले हो. यामध्ये यावर्षी २६४ शहरांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. पनवेल महानगरपालिकेने ही या सर्वे क्षणामध्ये सहभाग घेतला आहे. आपले



शहर राहण्यायोग्य शहरामध्ये समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या ‘eol2022.org’या वेबसाईटवरती जाऊन नागरिकांनी आपल्या शहराबद्दलचा अभिप्राय नोंदवावा असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. ‘नागरिक धारणा सर्वेक्षण’ चा उद्देश नागरिकांच्या त्यांच्या शहरांमधील जीवनमानाबद्दलच्या समजुतीबद्दल माहिती मिळवणे हा आहे. नागरिकांनी https://eol2022.org/citizenfeedback या लिंकवरती जाऊन सिटी युलबी कोड ८०२७९६ वापरून आपले अभिप्राय नोंदवावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## पनवेल परिसरातून २६ हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून अंमलीपदार्थात बाळ–गुन विक्री करताना एका इसमास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून ३ ग्रॅम चिटा ( ब्राउन शुगर) पावडरसह एकूण २६ हजार रुपये किमतीचे ऐवज जप्त केले आहे.

पनवेल शहर पोलिसांचे पथक पनवेल जवळील पळस्पे परिसरात गस्त घालत असताना महेश साहेब देशमुख (वय ३४ वर्षे) हा विटा (शुगर) हा अंमलीपदार्थात बाळगुन विक्री करताना आढळून आला. त्याच्या कडून पोलिसांनी ३ ग्रॅम चिटा ( ब्राउन शुगर) पावडरसह एक हजार रुपये किंमतीचा छोटा इलेक्ट्रोनिक काटा, प्रत्येकी एक हजार रुपये किंमीतीचे दोन मोबाईल, तसेच २१४००/– रुपये रोख असे एकूण एकूण २६ हजार रुपये किमतीचे ऐवज जप्त केले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आरोपी विरोधात एनडीपीएस कायदाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## शुक्रवारपासून रोटरी पनवेल महोत्सव

### पीडीजी रो. आशेष गांगुली व माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या विशेष उपस्थितीत होणार भव्य उदघाटन सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी फाऊंडेशन पनवेल व रोटरी क्लब ऑफ पनवेल यांच्यावतीने खांदेश्वर येथील सिडको मैदानावर ’रोटरी पनवेल महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे.

शुक्रवार दिनांक २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ०६ वाजता या महोत्सवाचा भव्य उदघाटन समारंभ सोहळा पीडीजी रो. आशेष गांगुली व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या विशेष उपस्थितीत होणार आहे.

यंदा या महोत्सवाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून १० दिवस चालणाऱ्या या महोत्सवात १८ हजार स्के. फुटाचे भव्य प्रीमियम स्टॉल असलेले प्रदर्शन, विविध वस्तूंचे २०० हुन अधिक स्टॉल, ५० हुन अधिक फूड स्टॉल, भव्य आकाश पाळणे तसेच इतर खेळ आणि मनोरंजनाची साधणे या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत.

त्याचबरोबर विविध स्पर्धा आणि कार्यशाळा सुद्धा असणार असून या महोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी पनवेल फेस्टिवलचे प्रोजेक्ट अध्यक्ष रो. राजेंद्र मोरे, रोटरी क्लब ऑफचे अध्यक्ष शिरीष नांदेडकर, सचिव श्रीकृष्ण पाटील यांनी केले आहे.



# संकेतभंगाची पुरवणी

विधिमंडळाच्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल ५२ हजार ३२७ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवल्या. गेल्या अनेक वर्षांतला हा एक नवा विक्रम आता शिंदे-फडणवीस सरकारच्या नावावर यामुळे जमा झाला आहे. राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे आर्थिक वर्षाच्या जमा खर्चाचा मांडलेला अंदाज असतो. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे आकारमान हे साधारणतः साडेपाच लाख कोटी रुपये इतके असते. मार्चमध्ये देशाचा अर्थसंकल्प मांडला जातो. त्या दरम्यानच देशातील प्रत्येक राज्य आपापला अर्थसंकल्प मांडते. मात्र, या अर्थसंकल्पातील अंदाजित खर्चात अनेक कारणांनी वाढ होते. त्यात प्रामुख्याने नैसर्गिक आपत्ती हे कारण असते. पूर, वादळ अशा गोष्टींमुळे झालेले नुकसान किंवा करोनासारख्या साथीमुळे नागरिकांसाठी करावी लागणारी अतिरिक्त वैद्यकीय व्यवस्था आदी कारणांमुळे मार्चमध्ये केलेला अंदाज चुकू शकतो. अनेकदा काही सुरू केलेले वा घोषणा करूनही सुरू न झालेले अशा पायाभूत प्रकल्पांच्या किमतीतही बाजारातील सिमेंट, पोलाद आदी वस्तूंच्या भाववाढीमुळे वाढ होते आणि अंदाज चुकतात. अशा वेळी सरकारला अतिरिक्त निधीची सोय करावी लागते. ही सोय सरकार पुरवणी मागण्यांच्या रूपाने सभागृहातील बहुमताच्या आधारावर करून घेते. मात्र, या पुरवणी मागण्या अर्थसंकल्पाच्या एकूण आकारमानाच्या किती प्रमाणात असाव्यात, याचे काही संकेत आहेत. जगातील कुठलीही लोकशाही व्यवस्था ही केवळ घटनेच्या आधारावर प्रगती करू शकत नाही. संकेत, प्रथा, परंपरा व अनुभव या आधारावरच लोकशाही अधिक प्रगल्भ होत असल्याचे इंग्लंडमधील संसदीय लोकशाही व्यवस्थेने सिद्ध केले आहे. मात्र, सध्या प्राचीन प्रथा व परंपरांना अनन्यसाधारण महत्त्व आलेले असताना संसदीय लोकशाहीच्या प्रथा परंपरांना लाथाडणे राजकीयदृष्ट्या अधिक महत्त्वाचे ठरत आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात आजवरच्या सर्वाधिक पुरवणी मागण्या सादर करण्याचा विक्रम सरकार करते यात फारसे नवल नाही. एकीकडे, 'रेवडी' अर्थकारणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी कठोर टीका करत असताना, काही भागातील मतदारांना खूष करण्यासाठी किंवा आयाराम-गयाराम लोकप्रतिनिधींची मर्जी राखण्यासाठी घोषणांची खिरापत वाटली जात असेल व त्यासाठी राज्याच्या वित्तीय नियोजनाचा बोजवारा उडण्याची भीती असेल, तर ते योग्य नाही. वास्तविक, फडणवीस याबाबत अत्यंत कठोर निर्णय घेण्यास सक्षम आहेत. मध्यंतरी एका बैठकीत त्यांनी अशा घोषणा करण्यापूर्वी राज्याच्या तिजोरीचाही जवाबदार मंत्र्यांनी विचार करायला हवा, असे चार खडे बोल सुनावले होते. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांना असलेला ५० आमदारांचा आधार यांच्या जिवावरच सरकार तरले असल्यामुळे यात उपमुख्यमंत्र्यांची अपरिहार्यता दिसून येते. मागील पावसाळी अधिवेशवनात म्हणजे राज्याचा अर्थसंकल्प सादर करून अवघे तीन महिने झालेले असतानाच शिंदे-फडणवीस यांच्या सरकारने जवळपास २८ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या. म्हणजे सहा महिन्यांच्या कालावधीत जर ७८ हजार कोटींपेक्षा अधिक पुरवणी मागण्या राज्य सरकार विधिमंडळात मंजूर करून घेणार असेल तर अर्थसंकल्प तरी कशाला मांडायचा, असा प्रश्न त्यामुळे उभा राहतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतःकडेच ठेवलेल्या नगरविकास खात्याकडूनच या ५२ हजार कोटींपैकी आठ हजार ९४५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. शहरांचे सौंदर्यीकरण, वैशिष्ट्यपूर्ण कामे आदींसाठी महापालिका तसेच नगरपालिकांना हा निधी दिला जाणार आहे. नक्की कोणत्या महापालिका व नगरपालिकांना हा निधी दिला जाणार आहे, याचा अभ्यास केल्यास पुरवणी मागण्यांच्या मागे अर्थशास्त्रापेक्षा राज्यशास्त्रीय सिद्धांतच अधिक प्रबळ असल्याचे सहज लक्षात येऊ शकते. देवेंद्र फडणवीस यांच्याकडील ऊर्जा विभागासाठी पाच हजार कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागाला सात हजार कोटी, ग्रामविकास विभागाला साडेपाच हजार कोटी आदी मागण्यांचा यात समावेश आहे. याला 'रेवडी किंवा खिरापत' असे म्हणणे योग्य ठरणार नाही. मात्र, गेल्याच अधिवेशनात २८ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेतल्यानंतर सहा महिन्यांतच असे कोणते मोठे खर्च राज्यापुढे उभे राहिले की, त्यांचा अंदाज सरकारला आला नव्हता, हा प्रश्न या निमित्तीने सरकारला करायला हवा. दुर्दैवाने, राज्यातील विरोधकही विधिमंडळाबाहेर 'पन्नास खोके' हे घोषवाक्य लिहिलेले फलक घेऊन उभे राहातात आणि विधिमंडळाच्या आतमध्ये मात्र 'इशारो इशारो में' समजून उमजून गप्प राहणेच पसंत करतात. सामान्य नागरिकांची अर्थसाक्षरता बेताचीच असल्यामुळे तेही आकडेवारीत लपलेले त्यांचे भविष्य समजून घेण्यापेक्षा संवेदनशील मुद्द्यांवरच अधिक प्रतिक्रिया देतात. निकष व संकेतांना धुडकावण्याचे बळ सत्ताधाऱ्यांना यातूनच मिळते व अर्थकारणाचा पाया ठिसूळ होण्याची नांदी हीच असते; हे मात्र विसरता कामा नये.

# नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामामुळे श्रीवर्धन वासियांना सहन करावा लागतोय धुळीचा त्रास

## ठेकेदाराने पाणी मारण्याची व्यवस्था करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गेल्या अनेक वर्षांपासून श्रीवर्धन शहराला शुद्ध पाण्याची समस्या भेडसावत होती. सत्तरच्या दशकामध्ये रानवली या गावी बांधण्यात आलेल्या पाझर तलावातून श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करण्यात येत असे. परंतु सदरचा पाणीपुरवठा हा डायरेक्ट धरणातून नळाला येत असल्याकारणाने पाणी शुद्धीकरण होऊन येत नव्हते. पर्यायाने नगरपालिकेच्या पाणीपट्टीवर देखील पाणी पिण्यायोग्य नाही अशा प्रकारचा शिक्का मारलेला असायचा. त्यानंतर २००९ पासून श्रीवर्धन नगर परिषदेच्या झालेल्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीमध्ये श्रीवर्धन शहर वासीयांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवणार असा अजेंडा अनेक राजकीय पक्षांनी मांडला होता. परंतु प्रत्यक्षात शुद्ध पाणीपुरवठ्याच्या प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी २०२२ साल उजाडले आहे.

या अगोदर श्रीवर्धन शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या कास्टिंग मेटलच्या होत्या. त्यामुळे त्या वारंवार फुटण्याच्या घटना देखील घडत असत. परंतु आता रानवली पाझर तरावाजवळच जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम सुरू झाले असून त्या ठिकाणाहून श्रीवर्धन शहरापर्यंत नवीन जलवाहिनी टाकून झाली आहे. तर शहरातील अंतर्गत जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. सदरच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी जेसीबी द्वारे अनेक ठिकाणी खोदकाम केले जात आहे. जलवाहिन्या टाकून झाल्यानंतर त्यावरती पुन्हा माती पसरून खोदकाम केलेले बुजवण्यात येत असून, सदर बुजवलेल्या माती वरती पाणी मारण्यात येत नसल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच नवीन जलवाहिन्यांची जोडणी प्रत्येक नागरिकाच्या घरापर्यंत करताना रस्त्याच्या मधोमध खोदकाम करण्यात आलेले असून यामध्ये खडी टाकण्यात आली असली तरीही, दुचाकी चालवताना मोठ्या प्रमाणावर ती दणका बसतो. त्यामुळे अनेकांना कमरेचे आजार व खांद्याचे आजार देखील उद्भवण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर ठेकेदाराने जोपर्यंत काम पूर्ण होत नाही. तोपर्यंत माती वरती पाणी मारून धुरळा उडणार नाही याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. व ज्या जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे अशा ठिकाणी तातडीने डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासक व मुख्याधिकारी विराज लबडे यांनी देखील या गोष्टीकडे तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी श्रीवर्धन मधील नागरिकांकडून केली जात आहे



# सततच्या पावसाने नुकसान झालेल्या पिकांसाठी भरपाई देणार : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । नागपूर**

सततच्या पावसाने नुकसान झालेल्या पिकांना भरपाई देण्यात येईल. मात्र यासाठी निकष ठरवले जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना दिली.

अतिवृष्टी अनुदानापासून वगळण्यात आलेल्या गावांबाबत सदस्य नारायण कुचे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधीला उत्तर देतांना श्री.फडणवीस बोलत होते. या विषयावरील चर्चेत विरोधीपक्ष नेते अजित पवार, सदस्य सर्वश्री राजेश टोपे, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, डॉ.संजय कुटे, हसन मुश्रीफ, हरिभाऊ बागडे, श्रीमती यशोमती ठाकूर, यांनी सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री म्हणाले की, 'अतिवृष्टीग्रस्त परिसरातील पिकाच्या नुकसानीसाठी एनडीआरएफ ने दर ठरवून दिले होते. या दरांनुसार नुकसान भरपाई देण्यात येते. नवीन दर नुकतेच घोषित केले आहेत. एनडीआरएफच्या निकषात सततचा पाऊस ही संकल्पना नाही. तरीही सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी आपण मदत दिली आहे. यापुढे सतत पडणाऱ्या पावसामुळे द्याव्या लागणाऱ्या मदतीसाठीचे निकष समितीमार्फत एक महिन्याच्या आत ठरविले जातील. विमा कंपन्यांच्या संदर्भात विचारलेल्या एका उपप्रश्नाला उत्तर देतांना श्री. फडणवीस म्हणाले की, विमा कंपनीने किती नफा कमवावा या संदर्भात मर्यादा निश्चित करण्यासाठी नविन धोरण आणणार असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी देण्यात येणाऱ्या रकमेसाठी कमीतकमी एक हजार रुपये किमतीचा मदतीचा धनादेश असावा, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. विमा संबंधी तक्रार निवारणासाठी विशेष तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अतिवृष्टीग्रस्त पिकांसाठी अनुदान देण्यासाठी ६६ मि.ली. पेक्षा जास्त पाऊस पडण्याचा निकष आहे. आतापर्यंत तीन हजार ५०० कोटींचे प्रस्ताव आले आहेत. सततचा पाऊस पडणाऱ्या परिसरात मदत देण्याकरिता निकष ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव, नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री उदय सामंत यांनी वरील लक्षवेधी संदर्भात बोलतांना दिली.

# शुक्रवारी जयपूर फूट बसविण्याचा कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक २३ डिसेंबर रोजी जयपूर फूट बसविण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सकाळी ९ वाजता शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे.

मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट संदर्भात ऑक्टोबर महिन्यात शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्या अनुषंगाने कृत्रिम हात, पायसाठी मापे घेण्यात आली होती. त्या १०२ व्यक्तींना हे कृत्रिम अवयव बसविण्यात येणार आहेत.

# सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । नागपूर**

राज्यातील सर्वच जातींतील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राज्यातील सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत सदस्य अशोक ऊर्फ भाई जगताप यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देतांना मुख्यमंत्री बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सफाई कामगारांच्या पाल्यांना/वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसारच नियुक्त्या दिल्या जात आहेत. ज्या ठिकाणी वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्त्या दिल्या जात नाहीत, अशा प्रकारांची माहिती लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, असे मुख्यमंत्र्यांनी उत्तरात सांगितले.

सफाई कामगारांची पदे भरताना मेहतर-वाल्मिकी समाजावर अन्याय होणार नाही, याबाबत मंत्रिमंडळ बैठकीतही सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे. मेहतर समाजाचा राज्य शासनाला आदर आहे. नगरपालिकेतील या समाजाच्या रिक्त जागा भरण्याबाबत नगरविकास विभागाला निर्देश देण्यात येतील.

राज्यातील सफाई कामगारांच्या सुविधांसाठी राज्य शासनाने लाड-पागे समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत विविध संघटनांकडून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनातील मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१८५६/२०२२

नि.नं.९

ने.ता.२४/०१/२०२३

(कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांचे कायदेशीर वारस)

१) श्री.नवीन जयंत तामस्कर (मुलगा)
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी

२) श्रीमती.सुवर्णा जयंत तामस्कर (पत्नी)
वय : ६४ वर्षे, धंदा : नोकरी

१ व २ रा.१३/सुश्रुत, सहावामजला, बीपीटी कॅम्पस, नाकडर्णी पार्क, वडाळा, ॲन्टॉप हिल, मुंबई-४०००३७

३) कु.नवेली जयंत तामस्कर (मुलगी)
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.८/बी, तिसरा मजला, चोकशी मेन्शन, डॉ.बी.ए.रोड, परेल, मुंबई-४०००१२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांचे निधन दि.०८/०२/२०२१ रोजी बीपीटी हॉस्पिटल, नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व), मुंबई ४०००३७ येथे झालेले आहे. कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांचा मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.जयंत प्रभाकर तामस्कर कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.जयंत प्रभाकर तामस्कर व त्यांच्या पत्नी श्रीमती.सुवर्णा जयंत तामस्कर यांनी मौजे : सुकापूर शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**१) निवासी सदनिका मौजे : सुकापूर शिलोत्तर रायचुर,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**विघ्नहर्ता को.ऑप.हौ.सो.लि.**
**रो हाऊस नं.६०**
**सर्व्हे नं.४६, हि.नं.१/५/ब,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ : १०७८ स्क्वे.फुट (कारपेट एरिया)**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१/१२/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# ग्रुप ग्रामपंचायत शिरवली

## ता. पनवेल, जि. रायगड

## जाहीर सूचना

दिनांक : २२/१२/२०२२

ग्रामपंचायत शिरवली ता.पनवेल, जि. रायगड ग्रामनिधी व १५ वा वित्त आयोगातून विकास कामे व साहित्यांच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | तरतूद रक्कम | इसारा रक्कम (नापरतावा रक्कम) | निविदा रक्कम | निविदा स्वीकारण्याची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वांगणी त.त. नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| २ | भल्याची वाडी येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ३ | करंबेळी वरची वाडी येथील नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ४ | करंबेळी खालची वाडी येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ५ | शिरवली येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ६ | आंबे त.त. येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ७ | कुत्तरपाडा येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ८ | कोंड्प येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | १५००००/- | १५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ९ | महोदर येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| १० | चिंचवली येथे नळपाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ५००००/- | ५००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| ११ | मौजे शिरवली येथे शांताराम दुर्गे घर ते स्मशानभूमी पर्यंत rcc रस्ता करणे (०/१५६ ते ०/२३०) | ३०००००/- | ३०००/- | १००/- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| १२ | बेंच/बाकडे खरेदी करणे | कोटेशन | ------- | ---- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| १३ | शिरवली शाळा येथे साहित्य पुरवणे | कोटेशन | ------- | ---- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |
| १४ | महोदर शाळेसाठी संगणक खरेदी करणे | कोटेशन | ------- | ---- | २२/१२/२०२२ | २९/१२/२०२२ | १ महिना |

१.निविदा मिळणेकरिता दि. २२/१२/२०२२ ते २८/१२/२०२२ रोजी दुपारी ठीक ५:०० वाजे पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२.भरलेल्या सीलबंद निविदा दिनांक २२/१२/२०२२ ते २८/१२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३.आलेल्या निविदा दि. २९/१२/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील .
४.मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
५.निविदा पोष्टाने दिनांक २२/१२/२०२२ ते २८/१२/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६.सदर जाहिरातीमधील मागविण्यात आलेल्या साहित्याचे,दुरुस्तीचे,उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.
७.अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.
८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामतबिलातून कपात केली जाईल.
९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०.उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .
११.निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१२.मंजूर काम पनवेल विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायात देखारेखीखाली करायचे आहे.
१३.निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१४ बिलातून नियमाप्रमाणे शासकीय कपात केली जाईल.
१५.काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१६.सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
१७.निविदा धारका कडे रिपिझरीवअसणे आवश्यक आहे.
१८.अंदाजपत्रकीय दरापेक्षा दाराची निविदा अस्वीकृत राहील.
१९.मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगन्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
२०.कमीत कमी दाराची निविदा मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.
२१.एक किवा सर्व निविदा नामंजूर करणेच अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत शिरवली, ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत शिरवली, ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## होंडा मोटारसायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील स्पर्श हॉस्पिटलच्या शेजारी चर्च च्या समोरील फूटपाथ लगत उभी करून ठेवलेली होंडा कंपनीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

प्रसाद केव्हीचंद्रन वोरीयर यांनी त्यांची ३० हजार रुपये किमतीची ग्रे रंगाची मोटारसायकल क्रमांक एम एच ०५ड़ सी एल ७६७१ हि स्पर्श हॉस्पिटलच्या शेजारी चर्च च्या समोरील फूटपाथ लगत उभी करून ठेवली असता चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नागोठणे विभागातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा बाळासाहेबांची शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

आपल्या गावाचा विकास बाळासाहेबांची शिवसेनाच करू शकते तसेच आपल्या अडीअडचणी देखील बाळासाहेबांची शिवसेनाच सोडवू शकते या विश्वासाने महाड पोलादपूरचे आमदार भरतशेठ गोगावले व अलिबाग मुरुडचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील नागोठणे विभागातील विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शनिवार दि. १७ डिसेंबर रोजी मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उद्योगमंत्री तसेच रायगड पालकमंत्री ना. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत बाळासाहेबांच्या शिवसेनेत जाहिर प्रवेश केला.

यावेळी सर्व प्रवेशकर्त्यांचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी स्वागत करुन नागोठणे विभागातील मूलभूत सुविधांना जास्तीत जास्त प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन प्रवेशकर्त्यांना दिले.

मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपले सरकार शेतकरी, कष्टकरी यांचे सरकार आहे. आम्ही नागोठणे विभागातील ज्या काही सुविधा आहेत त्याला जास्तीत जास्त प्राधान्य देणार आहोत.

हॉस्पिटल मधील सुविधा, नवीन कारखाने व त्याद्वारे नोक-ता देण्याकडे आम्ही भर देणार असून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी दिले.

# नैसर्गिक आपत्तींच्या उपाययोजनांबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आ-पत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प व राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत शासनास सादर करावयाच्या प्रस्तावांबाबतची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात संपन्न झाली.



यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपविभागीय अधिकारी महाड श्रीमती प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय अधिकारी पेण विठ्ठल इनामदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच इतर शासकीय विभागांचे विभाग तसेच कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रायगड जिल्हा हा बहुआपत्ती प्रवण जिल्हा असून जिल्ह्याची आपत्ती प्रवणता लक्षात घेता आपत्ती सौम्यीकरणाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने आपआपल्या स्तरावर स्थानिक नैसर्गिक परिस्थितीची इत्यंभूत माहिती घ्यावी.

मागील काही वर्षातील उद्भवलेल्या विविध नैसर्गिक आपत्तींचा अभ्यास करावा आणि त्याआधारे भविष्यात नैसर्गिक आपत्तींची आणि त्यातून घडणाऱ्या नुकसानीची पुनरावृत्ती होवू नये, यादृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. हे प्रस्ताव शास-नास सादर करण्यात येतील.

हे प्रस्ताव शासनास कोकण आपत्ती सौम्यीकरण योजनेंतर्गत सादर करण्यात येणार असून यात मुख्यत: खार प्रतिबंधक बांध प्रकल्प, धूप प्रतिबंधक बंधारा प्रकल्प, बहुउद्देशीय निवारा केंद्र, भूमीगत विद्युत वाहिनीकरण, संरक्षक भिंती उभारणे, क्राँक्रीट गटारे बांधणे, मोबाईल टॉवर उभारणे, वीज प्रतिरोधक यंत्र कार्यान्वित करणे, साकव दुरुस्ती करणे, सोलार हायमास्ट उभारणे, आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष स्थापन करणे व त्याकरिता आवश्यक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, पूर्व चेतावनी प्रणाली व पब्लिक ड्रेसिंग सिस्टम कार्यान्वित करणे, अशा विविध उपाययोजना आपत्ती सौम्यीकरणाच्या अनुषंगाने प्रस्तावित केल्या जाणार आहेत.

प्रत्येक शासकीय विभागाने रायगड जिल्ह्याची आपत्ती प्रवणता लक्षात घेता आपत्ती सौम्यीकरणाच्या अनुषंगाने अतिशय गांभीर्याने लक्ष देवून मनुष्य व वित्तहानी होणारच नाही, यादृष्टीने उपाययोजना कराव्यात. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सर्व प्रकारचे सहाय्य करण्यात येईल, असेही ते शेवटी म्हणाले.

# श्री सम्मेद शिखरला पर्यटन स्थळ जाहीर केले, जैन धर्मीयांतर्फे निषेध

**दै.रायगड नगरी । कर्जत**

झारखंड राज्यातील पारसनाथ स्टेशन येथील सम्मेद शिखर जी हे जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र असून झारखंड राज्य सरकारने हे तीर्थक्षेत्र पर्यटन स्थळ म्हणून जाहीर केले आहे याचा निषेध म्हणून नेरळ मधील जैन बांधवांनी तहसीलदार कर्जत यांच्याकडे निवेदन देऊन निषेध नोंदवला आहे, व निवेदन दिले राज्य आणि केंद्र सरकार पर्यंत पोचवावे हे निवेदन पाठवावे अशी मागणी केली.

नेरळ मधील श्री मुनीसुव्रत स्वामी श्वेतांबर मूर्तिपूजक जैन संघाच्या विनोद हिंगड, ललित जैन, संजय जैन, संकलेश जैन, भरत जैन, रणजित जैन राकेश परमार, धीरज, जैन राजू,अमित जैन, विनोद जैन अनिल जैन यांनी तहसीलदार डॉ. शितल रसाळ यांची भेट घेवून त्यांना निवेदन दिले.

झारखंड राज्य सरकारने जैन धर्माचे २० तीर्थकर या भूमीत मोक्ष गेले असे पवित्र स्थळ आहे या स्थळ श्री सम्मेद शिखरजी चे पर्यटन स्थळ जाहीर केले आहे, सम्मेद शिखरजी जैन धर्माची एक भूमीचा तुकडा नाही ते एक जिवंत शाश्वत तीर्थ आहे.

जिथे कणाकणात पवित्रता आहे ही भूमी ज्याचे पर्यटन स्थळांमध्ये रूपांतरित करणे म्हणजे भूमीची प्रवित्रता नष्ट करणे आम्ही जैन याचा जाहीर निषेध करतो.आणि झारखंड सरकारला विनंती करतो सम्मेद शिखरजी हे जैन धर्माचे प्रवीत्र स्थळ म्हणून जाहीर करावे ही विनंती करण्यात आली आहे.



# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शिघ्रे-वावडुंगी येथे बांधला वनराई बंधारा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास हे ब्रिद घेऊन शिघ्रे-नवीवाडी येथे दि.१७ ते दि.२३ डिसेंबर या कालावधीत सात दिवसीय श्रम संस्कार शिबिर आयोजित करून यामध्ये स्वच्छता मोहिम,ग्राम सफाई, वनराई बंधारा, आधार कार्ड, मतदार नोंदणी,सर्वे आदी.उपक्रम घेण्यात येत आहेत.त्याचाच भाग कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे, प्रा.डॉ. जी. डी.मुनेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ, कृषी सहायक मनोज कदम, अभिजित चौलकर मनीषा काळे आदीं.च्या सहकार्यातून वावडुंगी व शिघ्रे भागात माती,खडी, रेतीचा ७०० पिशव्यांचा वापर करून दि.२० डिसेंबर रोजी वनराई बंधारा बांधला.या वनराई बंधाऱ्यामुळे परीसरातील लोकांना ऐन टंचाई काळात वापर करता येईल.



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी प्रतिनिधी सृष्टी पाटील, संदीप बोरले, स्नेहा चव्हाण, वैष्णवी राजपूरकर,भुनेश आंबटकर यांचे वनराई बंधारा बांधण्यात विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे औचित्य साधून यादिवशी सायंकाळी ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक समीर धांडोरे यांनी एच.आय.व्ही.अर्थात एड्स रोगाबाबत तर तळे येथील द.ग.तटकरे विद्यालयाचे प्रा.मनोज वडवळ यांनी व्यक्तिमत्त्व विकास विषयावर व्याख्यान केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात ड्रोन तंत्रज्ञान आणि त्याच्या अनुप्रयोगाबाबत सेमिनार

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या इन्स्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनियरींग मधील कंप्युटर इंजिनिअरिंग विभागाकडून प्राध्यापक गीतांजली महामुणकर यांनी प्राचार्य डॉ. मधुकर अंबादास दाभाडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात विद्यार्थ्यांसाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि त्याच्या अनुप्रयोगां बाबत नाविन्यपूर्ण सेमिनार आयोजित केला होता. या सेमिनारमध्ये माणगांव येथील वन्यजीव अभ्यासक व छायाचित्रकार तथा ड्रोन तंत्रज्ञानाचे जाणकार शंतनु कुवेसकर व प्राध्यापक योगेश पाटील यांनी ड्रोनच्या विशेष वापराबाबत माहिती देऊन प्रात्यक्षिक दाखवून विद्यापीठाचे प्रत्यक्ष ड्रोन छायाचित्रण देखील केले.

ड्रोन स्कूल आणि टेक्नोलॉजी बाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी ड्रोन महोत्सवाचे आयोजन करणे तसेच ड्रोन तंत्रज्ञान व त्याचा वापर यावर विशेष कार्यशाळांचे विभागीय स्तरावर आयोजन करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाकडून विभागीय कार्यालयांकडे देण्यात आले होते. या अनुषंगाने विध्यार्थ्यांसाठी या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेमिनारमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाच्या इतिहासापासून आधुनिक प्रणाली सोबत ड्रोनचे सर्वच प्रकार व उपयोग, भविष्यातील व्याप्ती, ड्रोनच्या वापरानिगडीत सर्व कायदेशीर माहिती प्राध्यापक गीतांजली महामुणकर यांनी विस्तारितपणे विध्यार्थ्यांना समजाविली.

शेती मध्ये बियाणे पेरण्यापासून फवारणीपर्यंत तर कोणत्याही प्रकारची मनुष्य हानी टाळून लष्करी कारवाई व देखरेखीमधील विशेष उपयोग तसेच आपत्तीजनक काळात परिस्थितीचा आढावा घेत बचाव कार्यासाठी त्यानंतर कला,क्रीडा क्षेत्रातील छायाचित्रण, भूमापन व सर्वेक्षण, तसेच इतर अनेक प्रकारे ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर काळाची गरज बनला आहे. यासाठीच योग्य प्रशिक्षण व नियमांसोबत कायदेशीर रित्या त्याचा योग्य वापर ही महत्वाची बाब असल्याचे यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे यांनी सांगितले. तर प्राध्यापक योगेश पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ड्रोनचे प्रात्यक्षिक देण्यास या ठिकाणी शंतनु कुवेसकर सारख्या प्रतिभावंत युवा व्यक्तिमत्वाची उपस्थिती ही आपल्या इन्स्टिट्युट व सेमिनारमध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी सन्मानाची बाब असल्याचे सांगितले.

सेमिनारची सांगता करताना संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख, प्राध्यापक संतोष साबळे यांनी या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे विशेष आभार मानले. व इन्स्टिट्युटमध्ये अश्या प्रकारचा पहिल्यांदाच नाविन्यपूर्ण परिसंवाद घडून आल्याने आनंद व्यक्त केला. सेमिनारदरम्यान संगणक विभागातील सुमारे शंभर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसोबत प्रा.सिद्धेश जाधव, प्रा.प्रणाली भोसले, प्रा.प्रिती सदापुरे तसेच विभागातील कर्मचारी म.न. कांबळे, मनीषा शिंदे आणि मंगेश कडू उपस्थित होते.



---

मे.वाघमारे सो
प्रोसेस जमा रु.५०/-  अर्जदारातर्फे वकील श्री.एस.एन.तेलगे
श्री.दिनेश जे. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१५१५/२०२१
नि.नं.२०/ड
ने.ता.१०/०२/२०२३

श्रीमती.खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर
ह्याचे वारसदार
अली अकबर असगर अली जरीवाला  अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही  सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार हे मयत श्रीमती.खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर यांचे दत्तक पुत्र आहेत. अर्जदार यांची आई खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर ह्या दि.२४/०३/२०२१ रोजी शासकीय मेडीकल कॉलेज रतलाम मध्यप्रदेश येथे मयत झालेले असून ते रा.मु.मोमीनपाडा, एम.जी.रोड ८४५, पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी होते. कायद्यातील तरतुदीनुसार खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहे.

खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर हे हयात असताना त्यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जातील खालील वर्णनाची संयुक्तीक मिळकत आहे. सदर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, जि.रायगड**

| प्रॉपर्टी कार्ड अ.क्र. | प्रॉपर्टी कार्ड नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | ८४६ | २३.४ | |
| २ | ८४६/१ | ११.७ | |
| ३ | ८४६/२ | १४०.५ | |

**खालील वर्णनाची मिळकत**
**मौजे : पनवेल, जि.रायगड**

| प्रॉपर्टी कार्ड अ.क्र. | प्रॉपर्टी कार्ड नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | ८४५ | २० चौ.मी. | |
| २ | ८४५/१ | ३० चौ.मी. | |
| ३ | ८४५/२ | ५० चौ.मी. | |

**मौजे : पनवेल, जि.रायगड**

| अनु. क्र. | सिटी सर्वे क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ७९९ | २०.१ |
| २ | ७९९/१ | २३.४४ |
| ३ | ७९९/२ | ५०.२ |
| ४ | ८०० | १८.४४ |
| ५ | ८००/१ | २१.७ |
| ६ | ८००/२ | २१.७ |

वर वर्णन केलेली मिळकत खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार याचे नावे व्हावे याकरिता आवश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, खतिजा असगर अली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर यांच्या वारस हक्कासंबंधी वहिवाट, गहाण, दान, बक्षिस, खरेदी, साठेकरार अगर अन्य कोणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२१/१२/२०२२ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

मा.सोनावणे सो
ॲड.रजनी गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१७४६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२३

सुजाता विश्वनाथ मोरे व इतर  अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही  सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार १) सुजाता विश्वनाथ मोरे, २) सुशिल विश्वनाथ मोरे, ३) विजय विश्वनाथ मोरे आहेत. मयत विश्वनाथ शंकर मोरे ह्यांचे निधन दि.११/०७/२०२१ रोजी खारघर नवी मुंबई येथे झाले आहे. मृत्यूसमयी त्यांच्या नावाने खालील मालमत्ता होती व आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे यापुढे यास सदर मालमत्ता असे संबोधण्यात येईल.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

Row House Suvidham F-78/33, F Row House Line, Sector-12, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist-Raigad-410210, Maharashtra. Area 43.68 Sq. Mtr.

वरील प्रमाणे अर्जदार हेच मयत विश्वनाथ शंकर मोरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत व इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज वारस ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने अशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२१/१२/२०२२

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, १) श्री टेरेन्स झुंज्या अलवारीस, २) श्रीमती.सुगंधा गिलबर्ट अलवारीस रा.घर नं.८/ए, कोंबडभुजे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी सिडको लि.कडून मौजे : नोड पुष्पक वहाळ, येथील फाईल नं.KOM-ICOGS-370 प्रमाणे राखीव वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद भूखंडधारकांकडून यांच्याकडून माझे अशिल मेसर्स हेजल इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार १) विजय भवानजी पटेल, २) दिनानाथ एस मिश्रा रा.शॉप नं.५, निलकंठ ऑरा, प्लॉट नं.१९८ सी, सेक्टर २३, उलवे ४१०२०६ यांनी खाली वर्णन केलेल्या भूखंडापैकी ७०० चौ.मी. पैकी ७५ टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक KOM-ICOGS-370**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ | १८३ | ७०० चौ.मी. पैकी ७५ टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

मा.सोनावणे सो
ॲड.प्रिया मोरे

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१९०७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०२/२०२३

१) श्रीमती.इंदुबाई मुरलीधर गारळे
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.संग्राम मुरलीधर गारळे
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.अश्विनी मुरलीधर गारळे
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.फ्लॅट नं.२०५, २ रा मजला,
सिद्धी विनायक टॉवर, प्लॉट नं.८२,
सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.स्वाती मनोजभाई पुकले
लग्नापूर्वी स्वाती मुरलीधर गारळे
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डी ५४, चैतन्य टाऊनशिप १,
श्री हरी अव्हेन्यू, आनंद, गुजरात ३८८००१  अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२, ३ व ४ यांचे वडील कै.मुरलीधर सोमा गारळे यांचे दि.२३/०५/२०२१ रोजी किंग इडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल ॲण्ड मेडीकल कॉलेज, परेल, मुंबई येथे आजाराने निधन झाले. मयत कै.मुरलीधर सोमा गारळे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मालमत्तेचे वर्णन**
**१) फ्लॅट नं.२०५, २ रा मजला, सिद्धी विनायक टॉवर, प्लॉट नं.८२, सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मुल्यांकन रु.७,५०,०००/- (रु.सात लाख पन्नास हजार मात्र)**
**२) दुकान नं.३०, तळमजला, ग्रीनस्केप रॉयल, प्लॉट नं.२५, सेक्टर ०७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मुल्यांकन रु.५,५९,७९०/-**
**(रु.पाच लाख एकाणेसाठ हजार सातशे नव्वद मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मोकळ्या भूखंडावरील गवताला अज्ञात व्यक्तीने लावली आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहतीमधील सेक्टर ३० मधील मोकळ्या भूखंडावरील गवताला अज्ञात व्यक्तीने लावलेली आग अग्निशमन जवानांनी वेळीच आटोक्यात आणली.

खारघर सेक्टर ३५ ईमेरियम शाळेच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानात मोठ्या प्रमाणात गवत वाढले होते. वाढत्या उन्हामुळे गवतही सुकू लागले आहे. दरम्यान या गवतात अज्ञात व्यक्तीने आग लावून पसार झाले. मैदानात आगीचे प्रमाण वाढत असल्याचे पाहताच स्थानिक नागरिकांनी खारघर अग्निशमन केंद्राला माहिती दिली. त्यानंतर लगेच अग्निशमन जवानांनी घटनास्थळी दाखल होत आग विझवली.

## विहूर परीसरात मोबाईल टॉवर उभारण्यात यावा: फैसल उलडे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक- वर्षांपासून साळाव-मुरुड रस्त्यावर मुरुड शहरापासून चार-पाच कि.मी. अंतरावर असलेल्या विहूरगाव आजूबाजूच्या परीसरात रेंज मिळत नसल्याने याठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यात यावा. अशी मागणी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते फैसल उलडे यांनी केली आहे. भारत दूर संचार निगम लि., जियो, एअरटेल अन्य मोबाईल कंपनीच्या अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून, प्रत्यक्ष पाहाणी करून याठिकाणी मोबाईल टॉवर बसविण्यात योग्य ती उपाययोजना करण्यात येऊन याठिकाणी सुविधा उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी फैसल उलडे यांनी केली आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# ई रिक्षा संदर्भात स्थानिक आमदारांशी माथेरानकरांचे चर्चासत्र

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मा सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसारच माथेरान याठिकाणी नगरपालिकेने दि. ५ डिसेंबर पासून सात रिक्षां सोबत पायलट प्रोजेक्टला सुरुवात केली आहे. मंगळवारी (दि.२०) माथेरान व्यापारी संघटना व श्रमिक रिक्षा संघटनेच्या सदस्यांनी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन ई रिक्षा सुरू करण्यासाठी त्यांच्या परीने शक्य तेवढे सहकार्य केल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक ,पर्यटक व स्थानिक रहिवाशी या ई रिक्षाच्या सेवेमुळे समाधान व्यक्त करीत असल्याचे सांगितले .दस्तुरी नाका टॅक्सी स्टँड हे गावापासून तीन किलोमीटर दूर असल्याने नागरिकांची होणारी दमछाक यानिमित्ताने आता थांबली आहे. तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्ट नंतर कायमस्वरूपी ई रिक्षाची सेवा सुरू राहण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याची मागणी माथेरानच्या शिष्टमंडळाने केली.



हात रिक्षाच्या अमानवीय प्रथेतून मुक्ती मिळावी यासाठी श्रमिक रिक्षा संघटना गेल्या बारा वर्षापासून संघर्ष करीत आहे. ब्रिटिश काळा पासून माथेरानला वाहनांना बंदी आहे माथेरान प्रदूषण मुक्त रहावे असा उद्देश आहे. ई रिक्षा ह्या प्रदूषण मुक्त असल्याने हात रिक्षा चालकांना देण्यात याव्यात यासाठी संघटनेचे सचिव तथा निवृत्त शिक्षक सुनिल शिंदे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

कोर्टाने दि. १२ मे रोजी ई रिक्षा सुरू करण्याचे आदेश दिले. सध्या सात रिक्षांसोबत पायलट प्रोजेक्ट सुरू असून येथील चढ उताराच्या रस्त्यावर कोणत्या कंपनीच्या रिक्षा चालू शकतात याचा अभ्यास करून अहवाल राज्य सरकार कोर्टाला सादर करणार आहे.

यावेळी पालिकेचे माजी उपनगराध्य आकाश चौधरी, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, सचिव सुनिल शिंदे, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी , राकेश चौधरी यांनी चर्चेत भाग घेतला.

माथेरान साठी ई रिक्षाचा विषय अत्यंत महत्वाचा असल्याने आमदार महेंद्रशेठ थोरवे स्थानिकांसोबत संवाद साधण्यासाठी दि २ जानेवारी रोजी माथेरानला भेट देणार आहेत. काही व्यक्ती ई रिक्षा बंद करण्यासाठी शासनाकडे खोटेनाटे पुरावे सादर करीत आहेत ई रिक्षा सुरू झाल्याने १५०० कुटुंबांची उपासमार सुरू झाल्याचे सांगितले जाते वस्तुस्थितीत माथेरानला ९३५ कुटूंब आहेत सर्वांना नेहमीप्रमाणे धंदा मिळत आहे

### कर्जत तालुक्यातील प्रगती बचतगटाच्या महिलांना

# तेलंगणा येथील नॅशनल कॉन्फरन्सला उपस्थित राहण्याची मिळाली संधी

### बचतगटाच्या महिलांनी अनुभवला पहिला विमान प्रवास

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

हैदराबाद येथे झालेल्या बचतगट फेडरेशन बँक लिंकेज आणि बचतगट फेडरेशन वार्ड कार्यक्रमाला (दि.१६ व दि.१७ डिसेंबर २०२२) रोजी तेलंगणा येथे उपस्थित राहण्याची संधी कर्जत तालुक्यातील प्रगती बचतगट फेडरेशनच्या अध्यक्षा व बचतगटातील एक महिला हेमलता चिंबुलकर आणि बचतगट फेडरेशनच्या व्यवस्थापिका पदमावती गायकवाड यांना मिळाली.

तसेच महाराष्ट्रामध्ये बचतगट चळवळ आणि बचतगट फेडरेशन कशा प्रकारे कार्यरत आहे, याची माहिती यावेळी देण्यात आली. विशेष म्हणजे बचतगटाची महिला म्हणून विमान प्रवास करणे आणि नॅशनल कॉन्फरन्सला हजेरी लावणे खूपच प्रेरणादायी आहे आणि ती संधी, तो मान कोकणातील रायगडला मिळाला हे विशेष आहे.

तसेच या कॉन्फरन्ससाठी भारतातील एकूण २० राज्यातील प्रतिनिधी उपस्थित होते. प्रत्येक राज्यातील महिलांचे विचार, आचार अनुभवायला मिळाले, उत्साह पाहायला मिळाला, महिलांनी ठरविले तर त्या खूप काही करू शकतात, अशी माहिती प्रगती बचतगट फेडरेशनच्या अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून दिली.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पनवेल नगर, महर्षी वाल्मिकी शाखेचा वार्षिकोत्सव



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महर्षी वाल्मिकी शाखेचा वार्षिक उत्सव उत्साहात पार पडला. गोखले सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध डॉक्टर श्री आशिष जी गांधी उपस्थित होते, तसेच श्री श्याम नान-ाजी देसाई राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुटुंब प्रबोधन गतिविधी कोकण प्रांत कार्यकारणी सदस्य हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

संघाची ही शाखा पनवेल मधील गोखले हॉल समोरील गांधी उद्यानात रोज सकाळी सात ते आठ या वेळात लागते.अनेक तऱ्हेचे श्वसन व्यायामा चे प्रकार, शारीरिक व्यायाम, सूर्यनमस्कार, मनोरंजक खेळ, बौद्धिक कार्यक्रम इ.गोष्टी रोज केल्या जातात.

तसेच समाजोपयोगी अनेकवेध उपक्रम ही शाखा करते. या सर्व गोष्टी समाजातील सगळ्यांपर्यंत पोहोचाव्या म्हणून हा वार्षिकोत्सव घेण्यात आला होता. शाखेचे हे सर्व विविध उपक्रम पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन स्वरूपात स्क्रीनवर सादर केले गेले.

कालच म्हणजे १६ डिसेंबरला ढाका युद्धविजय दिवशी या शाखेतील वय वर्ष ६० च्या पुढील निवृत्त तरुणांनी शाखेत १५४० दंड प्रहार मारले होते. विशेष म्हणजे या शाखेतील ८१ वयाच्या व बायपास झालेल्या एका स्वयंसेवकांनी सुद्धा प्रहार मारले. या कार्यक्रमाला परिसरातील पुरुष व महिला असे साधारणतः शंभर- सव्वाशे लोक उपस्थित होते. कार्यक्रमात टाळीयोग व दंडयोग प्रात्यक्षिके झाली. या कार्यक्रमात नेपाळमध्ये जाऊन विविध आंतरराष्ट्रीय जल-तरण स्पर्धांमध्ये गोल्ड मेडल मिळवणाऱ्या आपल्या वाल्मिकी नगर मधील सनी टाक यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात डॉक्टर आशिष गांधी म्हणाले की संघामधून दोन गुण शिकण्यासारखे आहेत १ संघाची शिस्त आणि २ संघातील स्वयंसेवकांचा समर्पण भाव. तसेच या शाखेचे उपक्रम खूपच वाखाणण्यासारखे आहेत हे सुद्धा त्यांनी नमूद केले.

आलेल्या सर्व नागरिकांना उपयुक्त अशा विविध सेवा देणाऱ्यांची संपर्क सूची कामाला हात - हाताला काम ही वितरित करण्यात आली. समारोपाच्या कार्यक्रमात श्री शाम नानाजी देसाई यांनी संघाच्या इतिहासातील स्थित्यंतरे विषद केली.आणि ते म्हणाले की समाजात अनेक पंथ आढळतात त्यामध्ये देवभक्ती शिकवले जाते आणि संघामध्ये देशभक्ती शिकविली जाते. संघ हा अनेकवेध संकटातून मार्ग काढीत आला आहे व आज संघाच्या माध्यमातून जवळपास पावणे दोन लाख सेवाकार्ये देशभरात सर्व दूर चालतात आणि साधारणतः ६५ हजार शाखा सुरू आहेत. हे सर्व करत असताना असे दिसून येते की संघ आणि समाज७ एकरूप होऊन काम करत आहेत. त्यांचे हे विचार सर्वांना फार भावले आणी खेळीमेळीचा हा कार्यक्रम सर्वांना फारच आवडला.

# काशिद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिंदे गटाच्या वर्षा दिवेकर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायतीच्या नुकत्याच झालेल्या सभेत शिंदे गटाच्या वर्षा विलास दिवेकर यांची उपसरपंचपदी सर्वानुमते बिनविरोध निवड झाल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

काशिद ग्रामपंचायती मध्ये मयुरी धार्वे यांनी स्वखुशीने आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपद रिक्त झाले होते. ग्रामपंचायतीची सभा दि.२१ डिसेंबर २०२२ रोजी घेण्यात आली.यावेळी अध्यासिन अधिकारी तथा सरपंच नम्रता कासार-खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली. यामध्ये उपसरपंच पदाच्या झालेल्या निवडीत वर्षा विलास दिवेकर यांची उपसरपंचपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच वर्षा दिवेकर यांचा शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या सरपंच नम्रता कासार-खेडेकर, मावळत्या उपसरपंच मयुरी धार्वे,सदस्य संतोष राणे, विलास मोरे,तुळसा पवार, अंकुश चाचे, भरत बेलोसे, आत्माराम बेलोसे, सु-नील दिवेकर, नरेश धार्वे, हरिश्चंद्र कांगणे, सीताराम कांगणे,अमित खेडेकर, विलास दिवेकर,भिकेश दिवेकर, दिनेश दिवेकर, विलास सारंगे,लहू चाचे, उल्हास दिवेकर, संतोष कोदेरे,राजेंद्र पवार, नितेश मरावडे,सुशील खोपकर, जितेंद्र मोरे, विशाल खेडेकर, मितेश दिवेकर, नितिन दिवेकर, अनिकेत दिवेकर,भावेश दिवेकर, निशांत दिवेकर, समीर दिवेकर,आतिश दिवेकर, समीर दिघे, प्रविण घोले, सतीश धार्वे, जान्हवी खेडेकर, जयश्री दिवेकर, स्नेहा दिवेकर, विजय काते, ग्रामसेवक सुशांत ठाकूर, डाटा ऑपरेटर व कर्मचारी यांसह ग्रामस्थ व उपस्थित महिलांनी वर्षा दिवेकर यांच्या निवडीचे अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या .

# आम्ही पिरकोनकर समूहातर्फे रंगोत्सव 2023 चे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

समाजात चित्रकला, रांगोळी, हस्ताक्षर आदि कलांना प्रोत्साहन मिळावे. विविध कलागुणांना वाव मिळावा,नागरिकांमध्ये विविध कौशल्ये विकसित व्हावीत या अनुषंगाने उरण तालुक्यातील आम्ही पिरकोनकर समूहातर्फे रंगोत्सव २०२३ चे आयोजन रविवार दि.२२/१/२०२३ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल पिरकोन येथे करण्यात आले आहे.

रंगोत्सव २०२३ अंतर्गत चित्रकला, रांगोळी, हस्ताक्षर स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.विद्यार्थी, नागरिकांनी या स्पर्धे त मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आम्ही पिरकोनकर समूहातर्फे करण्यात आले आहे. नावनोंदणी करण्याचा अंतिम तारीख १५/१/२०२३ असून लहानगट , मध्यमगट, मोठा गट, खुला गट या वयोगटात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी खालील पदाधिकाऱ्यांना संपर्क साधावे. चेतन गावंड - ९८१९७५९१०५, तुषार म्हात्रे - ९८२०३४४३९४, गिरीश पाटील -९८७०४२९६७७

# जनकल्याण समितीच्या सेवारथ यात्रेस रोह्यातून प्रारंभ

**दै.रायगड नगरी । रोहा**

समर्पित भावनेने लोकोपयोगी आणि सेवाभावी कार्य राबविणाऱ्या जनकल्याण समितीतर्फे जिल्ह्यात सेवारथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या सेव-ारथास रोहयातून प्रारंभ झाले असून जिल्ह्यातील पाच हजार लोकांपर्यंत ही सेवारथ यात्रा पोहचणार असल्याचे संकल्प सोडण्यात आले आहे.

गेली पन्नास वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, संस्कार, कृषी, पर्यावरण, स्वावलंबन, पूर्वांचल विकास, आपत्ती विमोचन आदी विषयांमध्ये समर्पित कार्य सुरू असून समितीचे हे सुवर्णमोहोत्सवी वर्ष असल्याने विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आह. त्यानिमित्त दि. २० ते २७ डिसें. या कालावधीमध्ये सेवा रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून याचा प्रारंभ मंगळवारी रोह्याच्या श्रीराम मारुती चौकातून करण्यात आले. जनकल्याण समितीचे काम जनमानसात सर्वदूर पोच-ावे हा या सेवारथाचा प्रमुख उद्देश असून यामाध्यमातून रोहा, पाली, नागोठणे,



माणगाव, पोलादपूर, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, मुरुड आदी ठिकाणी पाच हजार लोकांपर्यंत संपर्क करण्याचा मानस असल्याचे आयोजकांतर्फे सांगण्यात आले. माजी नगरसेविका सौ. अपर्णा पिंपळे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले. जनकल्याण समिती रायगडचे अध्यक्ष जयेश छेडा यांनी यावेळी या सेवारथाचे उद्देश उपस्थितांना सांगितले.

सौ. अपर्णा पिंपळे यांनीही आ-पले विचार व्यक्त केले. यावेळी समितीचे कोकण विभागाचे कार्यवाह अविनाश धाट, निधी प्रमुख गिरीश पेंडसे, जनकल्याण समिती रायगड जिल्हा अध्यक्ष जयेश छेडा, कार्यवाह पुरुषोत्तम कुंटे, निधी प्रमुख ऍड. धनंजय धारप, कोषाध्यक्ष श्रीपाद गिरधर, सह कार्यवाह सौ. अरुंधती पेंडसे, शिक्षण -संस्कार आयाम रायगड विभाग प्रमुख सौ. आरती पेंडसे, सह कोषाध्यक्ष विष्णु जोशी ,जनकल्याण समिती रोहा प्रमुख श्रीनिवास साठे सर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ रोहा तालुका कार्यवाह संजीव कवितके, भाजपा रोहे शहर अध्यक्ष यज्ञश भांड, उत्तम भांड, मकरंद गोविलकर, अनंत साने आदींसह रोहेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोहा येथून मेढा व पुढे नागोठणे येथे सेवारथ मार्गस्थ झाले.

# जैन धर्मियांच्या वतीने बंदच्या हाकेचा मुरूडमध्ये फज्जा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्री सममेद शिखरजी यास पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ मुरुड शहरातील सकल जैन समाजाच्या वतीने बुधवार दि.२१डिसेंबर रोजी मुरूड बंदचे आयोजन करण्यात आले होते तसेच जैन समाजातील समस्त मुलामुलींना शाळा व कॉलेजमध्ये न पाठवता मोर्चामध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन करण्यात आले होते.

या बंदच्या हाकेला मुरूड जैन समाज बांधवांनी प्रतिसाद न देता अक्षरशः फज्जा उडाला असल्याचे चित्र दिसून आले.

श्री सम्मेद शिखरजीला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ संपूर्ण भारतभर जैन समाजाच्या वतीने निषेध नोंदविण्यासाठी बंदचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्रातील जैन बांधवांनी काही प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. तर मुरुड शहरात जैन बांधव या बंद मध्ये सहभागी न झाल्याने या बंदचा अक्षरशः फज्जा उडाला असल्याचे चित्र दिसून आले .

# नाईक-अंतुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर आगरवाडा येथे सुरु

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्याल्याच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन म्हसळा तालुक्यातील आगरवाडा येथे महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महादेव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष रफिक चणेकर, विश्वस्त सचिव प्रतिनिधी फझल हलदे, म्हसळा पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे, म्हसळा नगराध्यक्ष असहल कादिरी, नासिर मिठागरे, राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुका अध्यक्ष समीर बनकर, समाजसेवक प्रदिप कदम, शकूर घनसार, महाविद्यालयाचे प्राचार्य दिगंबर टेकळे, माजी प्र.प्राचार्य एम.एस.जाधव, ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष कानू नाक्ती, उपाध्यक्ष अंकुश गाणेकर, सचिव लक्ष्मण गाणेकर सहसचिव प्रकाश गाणेकर उपसरपंच जनार्धन गाणेकर, मुंबई अध्यक्ष हरिश्चंद्र गाणेकर, गाव पाटील जनार्दन भायदे, महिला सचिव सुजाता नाक्ती, तुकाराम भायदे, भानुदास गाणेकर.रामा गाणेकर आदी महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाविद्यालय विकास समिती संस्था प्रतिनिधी फजल हळदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सांगितले की, तरुणांनी वाईट गोष्टीचा त्याग केला पाहिजे.देशाचा झपाट्याने विकास होणेचा असेल तर तुम्ही ध्येय समोर ठेवणे गरजेचे असून ध्येयाचा पाठलाग करणे अत्यावश्यक असल्याचे सांगून त्यांना वरीष्टांकडून सहकार्य मिळाले तरच ध्येय पुरती यशस्वी होईल. उच्च शिक्षण घेऊन विकासाची दिशा ठरविण्याचे आवाहन त्यांनी केले. या सात दिवशीय शिबीरात तुम्ही जेवढे ज्ञान आत्मसात कराल तेवढ ते तुमच्या भावी आयुष्यात उपयोगी पडेल अशी आशा फझल हालडे यांनी सांगितले.

म्हसळा पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की,कोठारी आयोगानुसार १९६९ पासून म. गांधी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना हा स्तुत्य उपक्रम सुरु झाला. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, राष्ट्र निर्मिती, चांगला नागरिक होण्याची क्षमता निर्माण व्हावी हा यामागचा प्रमुख उद्देश होता. छ. शिव-ाजी महाराजांच्या पावन भूमीत आपण जन्मलो या पेक्षा दुसरं कोणतं भाग्य असू असेल असं बोलण वावग ठरू नये असेही संदीपान सोनावणे यांनी या प्रसंगी सांगितले. याच पवित्र भूमीत बॅ. अंतूले सारखं रत्न जन्माला आलं आणि दूरदृष्टी ठेऊन त्यांनी संपूर्ण कोकणाचा कायापालट केला, म्हसळा सारख्या ग्रामिण आणि डोंगराळ भागात शिक्षणाची दालने उघडली त्याबद्दल बॅ. अंतूले यांचे जेवढे आभार मानावे तेव्हढे कमी होतील असेही त्यांनी सांगितले. एखाद्या पदावर पोचावे यासाठी हुशारच असणे गरजेचे नाही तर त्याच्या अंगी आवड, जिद्द असणे अत्यावश्यक असल्याचे सोनावणे यांनी सांगितले.

या शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, ग्रामस्थ यांनी खूप मेहनत घेतली असून त्याची जाणीव जरी विद्यार्थ्यांनी ठेवली तरी आपण खूप काही शिकलो याचे समाधान लाभेल असे सोनावणे यांनी शेवटी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये रफिक चणेकर यांनी सांगितले की, या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार तर घडतात शिवाय आपल्यातील कलागुणांना वाव मिळेल आणि आपल्याला या माध्यमातून व्यासपीठावर जाण्याची संधी प्राप्त होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक संजय बेंद्रे यांनी केले तर प्राध्यापक सुमित चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.